सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४४ | बुधवार, दि. २७ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४००००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६४००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६३०/-
भाव प्रती १० ग्राम

**अभीष्टचिंतन**



श्री. राधे पुरोहित
अमळनेर





अमळनेर : संसद रत्न पुरस्काराबद्दल खासदार स्मिताताई वाघ यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त डी. ए. सोनवणे, मंगलसेवेकरी प्रकाश मेखा, योगेश महाजन आदी. दुसऱ्या छायाचित्रात सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे पुरोहित. (छायाचित्र : नितेश बारी)

# खा. स्मिताताईंचा 'संसद रत्न' पुरस्काराबद्दल गौरव!

## मंगळग्रह सेवा संस्था व दैनिक ग्लोबल महातेज परिवारातर्फे सन्मानपत्र प्रदान


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय खासदार स्मिताताई वाघ यांना दुसऱ्यांदा 'संसद रत्न पुरस्कार' मिळाल्याबद्दल अमळनेर येथील सुप्रसिद्ध मंगळग्रह सेवा संस्था आणि दैनिक ग्लोबल महातेज परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने सन्मानपत्र देऊन अत्यंत उत्साहात सन्मानित करण्यात आले.

या गौरव सोहळ्याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम,खजिनदार गिरीश कुलकर्णी, डी. ए. सोनवणे, मंगलसेवेकरी प्रकाश मेखा, जिल्हा उपाध्यक्ष भाजपचे लालचंद सेनानी, शहराध्यक्ष योगेश महाजन,भाजप मंडल अध्यक्ष राहुल पाटील, सरचिटणीस प्रा. भरतसिंग परदेशी, सरचिटणीस देवाभाऊ लांडगे, जिल्हा भटक्या जाती जमाती उपाध्यक्ष दीपक भोई, सरपंच रजनी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष एसटी मोर्चा सुभाष पाटील, जिल्हा किसान मोर्चा सरचिटणीस संजय पाटील, ग्लोबल महातेज परिवार आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान, या सत्काराने स्मिताताई कमालीच्या भावूक झाल्या होत्या त्यांनी उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच मंगळग्रह सेवा संस्था व ग्लोबल महातेज परिवाराचे आभार मानले. आतापर्यंत पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी खासदार स्मिताताई वाघ यांनी यशस्वीपणे पेलली आहे. जनतेच्या ज्वलंत प्रश्नांना सभागृहात आणि रस्त्यावर वारंवार वाचा फोडणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. आता खासदार म्हणून दिल्लीच्या संसदेत पोहोचल्यानंतर, त्या या भागातील जनतेच्या प्रश्नांना अधिक आक्रमकपणे आणि प्रभावीपणे न्याय देत आहेत. त्यांच्या याच उत्कृष्ट संसदेतील कामगिरीबद्दल त्यांना मिळालेल्या 'संसद रत्न' पुरस्काराबद्दल जिल्ह्यातून आणि सर्वच स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### अभिनंदनाचा डबल मंगल धमाका

**"स्मिताताईंना पहिल्यांदा संसद रत्न पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचा पहिला जाहिर सत्कार मंगळग्रह सेवा संस्थेने केला होता. आता दुसऱ्यांदा संसद रत्न पुरस्कार मिळाल्यानंतर सर्वप्रथम मंगळग्रह सेवा संस्थेनेच स्मिताताईंचा सन्मानपत्र देऊन सत्कार केला. आगामी काळात संसद रत्न पुरस्काराची हॅट्रिक होईल याबद्दल आशा आहे. असे घडल्यास त्यांचा तिसऱ्यांदा सत्कार देखील प्रथम आम्हीच करू.**
**डॉ. डिगंबर महाले,अध्यक्ष –मंगळग्रह सेवा संस्था**



श्री मंगलग्रह मंदिर
अमळनेर

# ॥ सन्मानपत्र ॥

**ताई, तुमची असामान्य जिद्द लोकसेवा आणि कर्तृत्वाला**
**मानाचा मुजरा...!**

**ध्येय उंच, विचार निर्मळ...**
**सेवाभाव जिव्हाळ्याचा...**
**जनतेच्या विश्वासातून प्रवास यशाच्या वाटेचा...!**
**कर्तृत्वाने उजळला मान महाराष्ट्र भूमीचा...**
**गौरव वाढविला आपण जळगाव लोकसभा मतदारसंघाचा...!!**

**ताई, आज आम्ही अत्यंत अभिमानाने, आदराने, कृतज्ञतेच्या भावनेने जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधी, कर्तृत्ववान नेत्या आणि संघर्षातून तेजस्वी नेतृत्व घडविणाऱ्या आमच्या भगिनीस्वरूप म्हणून आपणास विनम्र अभिवादन करीत आहोत.**

हे सन्मानपत्र आपणास सहर्ष देताना आमच्यातही गौरवान्वित अनुभूती आहे. लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात प्रथमच खासदार म्हणून निवडून आल्यानंतर अल्पावधीतच सलग दुसऱ्यांदा संसद रत्न पुरस्कार प्राप्त करणे ही केवळ आपली वैयक्तिक उपलब्धी नाही, तर पक्ष, पक्षश्रेष्ठी, कार्यकर्ते व जनतेच्या, विश्वासाला दिलेले हे प्रभावी उत्तर आहे. हा सन्मान आपल्या अभ्यासपूर्ण संसदीय कामगिरीचा, जनहिताच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा आणि लोकशाहीप्रती असलेल्या निष्ठेचाच गौरव आहे. संसदेच्या अधिवेशनकाळात भटकंती, खानपानाची मौज-मजा, ऐशोआराम, राजवैभवाचा ताम-झाम या कणभर बाबींना मणभर महत्त्व न देता आपण सच्चे लोकप्रतिनिधी या नात्याने संसदेत ठाण मांडून बसलात. देश हितार्थ व लोकाभिमुख प्रश्नांवर आपण हिरिरीने भाग घेतला. आपल्यासाठी नवख्या असलेल्या अनेक बाबी आपण कुशाग्र, एकाग्रचित्त, चौकस व ज्ञानपिपासू असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनोभूमिकेतून शिकून घेतल्या. शारीरिक पीडा सातत्याने आपल्याविरुद्ध बंड पुकारत होत्या. मात्र, आपण खमक्या मनोवृत्तीने ते बंड मोडून काढले. दुःख, कष्ट, पीडा, वेदना आणि टीका यावर लीलया मात केली. आपल्या या यशामागे केवळ राजकीय वाटचाल नाही तर त्यामागे आहे संघर्ष, धैर्य, संयम आणि न थकणाऱ्या इच्छाशक्तीची एक प्रेरणादायी जीवनगाथा. विद्यार्थीदशेपासूनच आपण अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या चळवळीत सातत्यपूर्ण सक्रिय राहिलात. तेथूनच आपल्या सार्वजनिक, समाजसेवी व काहीशा राजकीय जीवनाची आपण दमदार पायाभरणी केली. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्या, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा, विधान परिषदेच्या सदस्या, भारतीय जनता पक्ष महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा म्हणून विविध जबाबदाऱ्या आपण समर्थपणे पार पाडल्या. बदलत्या राजकारणात आपण मात्र बदलला नाहीत. पक्षश्रेष्ठी व पक्षावरील निष्ठेला, जनता-जनार्दनाच्या आपल्याप्रती असलेल्या विश्वासाला आपण विपरीत परिस्थितीत आणि नैराश्याच्या गर्तेत असताना जराही तडा जाऊ दिला नाही. त्याचाच परिणाम आणि परिपाक म्हणून पक्षाने आपणास लोकसभेची उमेदवारी दिली. आपले दीर्घकालीन सेवाभावी कार्य, नम्र तथा सोज्वळ व्यक्तिमत्त्व व सर्वच थरातील मतदारांचा, पक्षातील व मित्रपक्षातील कार्यकर्ते आणि नेत्यांची लाभलेली भक्कम साथ, या सर्वांचा आपल्यावरील नितांत विश्वास यामुळे प्रचंड मतांनी आपण विजयी झालात. आतापर्यंत पक्षाने आपणास दिलेल्या सर्वच जबाबदाऱ्या आपण समर्थपणे पार पाडत आहात. जनतेच्या ज्वलंत प्रश्नांना आपण वारंवार वाचा फोडली आहे. आपले कार्य गगनस्पर्शी असले तरीही 'घार उडते आकाशी...लक्ष मात्र तिचे जमिनीवरील पिलांपाशी...!' या उक्तीप्रमाणे आपले पाय नेहमी जमिनीवरच राहिले आहेत. सर्वसामान्यांमध्ये सहज मिसळणारे आणि सर्वांनाच नेहमी आपल्या परिवार सदस्या वाटणाऱ्या... सर्वांची भगिनी आणि मातृतुल्य व्यक्तिमत्त्व यातून नेतेपदाचे आगळेवेगळे आयामही आपण अधोरेखित केले आहेत. ऐन उमेदीत पतीच्या निधनासारखा अत्यंत वेदनादायी प्रसंग... त्यानंतर गंभीर आजाराशी झुंज देत जीवघेणा संघर्ष आणि तरीही जनतेप्रती असलेली बांधिलकी अबाधित ठेवत स्वकीय आणि परकीय यांच्या कधी छुप्या तर कधी खुल्या विरोधाला आणि बंडाला न डगमगता खोल पाय रोवून राजकीय, सामाजिक व सार्वजनिक जीवनात आपण जरा देखील न कचरता समर्थपणे व सक्षमपणे उभ्या ठाकल्या आहेत. हे आपल्या असामान्य नेतृत्वाचे, धीरोदात्त वृत्तीचे, संयमाचे व सामर्थ्याचे उदाहरण आहे. कदाचित आपल्यासारख्याच व्यक्तिमत्त्वांना उद्देशून माजी पंतप्रधान स्व. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी म्हणतात...

*हार नहीं मानूँगा, रार नहीं ठानूँगा,*
*काल के कपाल पर लिखता-मिटाता हूँ, गीत नया गाता हूँ ।*
**तर कुसुमाग्रजांच्या काव्यपंक्तींनाच पुढे नेत म्हणावेसे वाटते, की...**
*वादळांना घाबरून वाटा बदलत नाहीत... ज्यांच्या ध्येयात जिद्द असते त्यांची पावले थांबत नाहीत...!*
*या गौरव क्षणासाठी दुःखाच्या राखीतून जिद्दीची ज्योत पेटली...!!*
*संघर्षाच्या वाटेवरून यशाची वाट फुलली... लोकसेवेच्या ध्यासाला कर्तृत्वाची जोड लाभली...*
*संसदेच्या सभागृहात जळगावची आपल्यामुळे मान उंचावली...!!!*

आपल्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्व आहे, संघर्ष आहे, संवेदनशीलता आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जनतेच्या विश्वासाचे उत्तरदायित्व आहे. ताई, हा केवळ आपल्या कार्याचा सन्मान नाही तर तो धडपडणाऱ्या आणि चाचपडणाऱ्या व्यक्तींसाठी प्रेरणादायी संदेश आहे. ताई, तुमच्यासारख्यांना कोणत्याही प्रकारची संकटे, यश, कीर्ती, आदर सन्मान यापासून रोखू शकत नाहीत. खरेतर संकटेच आपल्यासारख्यांच्या अविचल व्यक्तिमत्त्वाला अधिक विशाल बनवितात.

*संघर्षातून उभी राहिली यशाची एक वाट..., सेवा, समर्पण, जिद्दीने मिळविला जनविश्वास दाट...!*
*संसदेच्या सभागृहात घुमला आपल्या कार्याचा स्वर... कर्तृत्वाने उजळला जनतेच्या आशेचा आदर...!!*

**आपल्या या अभूतपूर्व यशाबद्दल आपले करावे तेवढे कौतुक आणि अभिनंदन थोडेच आहे. आपले कार्य, संघर्ष, संवेदनशीलता आणि लोकहिताचा ध्यास केवळ आपल्या परिवारापुरताच सीमित न राहता भावी पिढ्यांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरावा.**

**आपणास निरामय उदंड आयुष्य लाभो...! जनकल्याणासाठी आपणास उदंड ऊर्जा लाभो...!! याच अनेकोत्तम 'मंगलमय' शुभेच्छांसह...!**

**सदैव आपले हितचिंतक / शुभेच्छुक**

**मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर** | **दै. 'ग्लोबल महातेज' परिवार**

# गो–तस्करीवर पोलिसांचा अंकुश
## ५ महिन्यांत १० गुन्हे, ४२ गुरांची सुटका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात गो–तस्करीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. जानेवारी २०२६ ते मे २०२६ या पाच महिन्यांच्या कालावधीत गो–तस्करीचे १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवायांमध्ये आतापर्यंत तब्बल ४२ गुरांची सुटका करण्यात आली आहे. त्यांना संगोपनासाठी विविध गोशाळांमध्ये हलविण्यात आले आहे.

गो–तस्करीच्या प्रकरणांशी संबंधित २० ते २२ संशयितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या सततच्या धडक मोहिमेमुळे गो–तस्करी करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

पान २ वर

**"बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट बंदोबस्तासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले असून, शहरातील प्रमुख मार्ग, चौक आणि संवेदनशील ठिकाणी कडक नाकाबंदी करण्यात आली आहे. गोवंशाची अवैध वाहतूक होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेतली जाणार असून, संशयित वाहनांची काटेकोर तपासणी करण्यात येत आहे.**
**दत्तात्रय निकम,** पोलीस निरीक्षक

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
**जय स्वदेशी...!!**

# अमळनेर येथे संत शिरोमणी भिमा भोई जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथिल संत शिरोमणी भिमा भोई जयंती भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने महाभंडाऱ्याचे आयोजन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सामूहिक आरती करण्यात आली.भोईवाडा, बहादरपूर नाका, रुबीजीनगर तसेच पैलाड परिसरातील हजारो समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी एकत्र येत भक्तीभावाने जयंती उत्सव साजरा केला.यावेळी सुरेश शिंगाणे, अनिल महाजन, भीमराव शिंगाणे, रोहन वडिले, हिरालाल भोई, साहेबराव शिंगाणे, संतोष शिंगाणे, पांडुरंग शिंगाणे, सुदाम शिंगाणे, देविदास भोई, पंकज मोरे, प्रकाश शिंगाणे आणि भाऊसाहेब महाजन यांचे भोई समाजाच्या वतीने मोलाचे योगदान लाभल्याबद्दल सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पांडुरंग शिंगाणे (नगरसेवक), दीपक शिंगाणे, मोहन भोई, हिरालाल भोई, राजेंद्र शिंगाणे, रवींद्र शिंगाणे, श्रीराम भोई, भीका भोई, संतोष शिंगाणे, पंकज भोई (नगरसेवक), दिनकर भोई, शशिकांत शिंगाणे, मनोज शिंगाणे, सुदाम शिंगाणे, गणेश शिंगाणे, देवा भोई, विजय शिंगाणे, सागर भोई, दीपक ढोले, संदीप शिंगाणे, विकी शिंगाणे आणि प्रवीण शिंगाणे यांनी मोलाचे सहकार्य केले.



अमळनेर : कॅटसी –२०९ प्रशिक्षण शिबीरात शिबीरार्थीसह लेफ्टनंट कर्नल पिनाकी बनिक, कॅप्टन डॉ. भारतकुमार सपकाळ, कॅप्टन डॉ. प्रमोद चौधरी, लेफ्टनंट डॉ. राहुल जाधव आदी.

## संपादकीय

# पेपरफुटीचा पॅटर्नही लातूरच!

वैद्यकीय क्षेत्रातील गुणवत्ता टिकून राहावी म्हणजे वैद्यकीय शिक्षणासाठी आवश्यक असलेली पात्रता सिद्ध व्हावी आणि समाजाला चांगले डॉक्टर्स, वैद्य मिळावे, या हेतूने देशपातळीवर राष्ट्रीय प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट' ही परीक्षा पद्धती राबविली जाते. ज्या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते त्या उद्देशालाचा काळीमा फासणाऱ्या पेपरफुटीच्या घटना सलग तीन वर्षांपासून घडत आहेत. यावर्षीच्या पेपरफुटीतून जी काही माहिती समोर येते आहे ती पाहिल्यानंतर खासगी क्लासेस आणि पेपर तयार करणारे प्राध्यापक आणि जेथून त्याची छपाई होते आणि लाखोंनी त्याची विक्री करणारे हस्तक अशा या चांडाळचौकडीने नीट परीक्षेचे पूर्ण तीनतेरा वाजवले यातला धक्कादायक भाग असा आहे, की महाराष्ट्रातील जवळपास तिघे जण त्यामध्ये अडकले आहेत. यात एक प्राध्यापिका मनीषा मांढरे यांचा समावेश अधिकच धक्कादायक ठरतो. नाशिकमधील शुभम खैरनारला झालेली अटक आणि व्हाया नाशिक लातूरपर्यंत येऊन पोहोचलेले पेपरफुटीचे धागेदोरे म्हणजे पेपरफुटीचा लातूर पॅटर्नच स्पष्ट करणारा आहे. तेथील आरसीसी कोचिंग क्लासचा शिवराज मोटेगावकर याला झालेली अटक म्हणजे खासगी क्लासेसने नीट परीक्षांसाठी सुरू केलेली उघड-उघड दुकानदारी ठरते. हा मोटेगावकर आपल्या क्लासची जाहिरात करताना डॉक्टर, इंजिनिअर बनवण्याची फॅक्टरी असेच शब्द वापरत होता. केवळ दहा वर्षांमध्ये कोट्यवधी रुपये कमावण्याची किमया या मोटेगावकरला साधली. म्हणजे त्याच्या या कमाईचे गुपित अशाच पेपर फुटीमध्ये दडलेले होते. हेही स्पष्ट होते. हे पेपरफुटीप्रकरण आता सीबीआयकडे सुपूर्द केलेले आहे. हरियाणा, यूपी, मध्य प्रदेश, राजस्थान येथून काही लोकांना अटक झालेली आहे. म्हणजे चांगले डॉक्टर्स तयार होण्यासाठी पेपरफुटीचा भेसळयुक्त औषधांचा उपचार या समाजकंटकांनी केलेला आहे. त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे यात काही शंका नाही. परंतु आपली न्यायव्यवस्था आणि तपास यंत्रणा या सगळ्यांचा विचार केला तर फार मोठी शिक्षा होईला असे समजायचे कारण नाही.

या तिन्ही लोकांना झालेली अटक महाराष्ट्रासाठी सर्वाधिक लाजिरवाणी ठरते. पंचवीस वर्षांपूर्वी दहावी परीक्षेचा उत्तम गुण मिळविण्याचा पॅटर्न याच लातूर शहराने प्रस्थापित केला होता. विद्यार्थ्यांची तयारी कशी करून घ्यायची. प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करून उत्तरपत्रिका लिहिण्याची वेगळी पद्धतही लातूर शहरातील शाळांनी राबविली होती. त्याचा उपयोग असा झाला, की सलग पाच-सहा वर्षे संपूर्ण राज्यात लातूर विभागाचा निकाल सर्वाधिक लागत होता. राज्यातील अनेक शाळांमधून हा लातूर पॅटर्न राबवून आपापल्या शाळांची गुणवत्ताही वाढविली होती. परंतु आता गेल्या काही वर्षांत लातूर विभागाचा निकाल पूर्वपदावर आलेला आहे आणि आता तर 'नीट' परीक्षांबाबत मोटेगावकर याने लातूर म्हणजे पेपरफुटीची फॅक्टरी असेच त्याचे स्वरूप करून टाकले. जवळपास दहा दिवस आधी 'नीट' परीक्षांची प्रश्नपत्रिका या पेपरफुटी फॅक्टरीवाल्यांच्या हाती लागली होती. ज्या अर्थी तब्बल दहा-दहा दिवस आधी प्रश्नपत्रिका हाती लागत असते तर यासाठी काम करणारे नेटवर्क किती प्रस्थापित स्वरूपाचे असेल याची कल्पना येत नाही. सलग तीन वर्षे पेपर फुटणे हा भाग तर आहेच. परंतु त्यासाठीचे नेटवर्क गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असले पाहिजे आणि दहा दिवस आधी प्रश्नपत्रिका मिळतही असल्या पाहिजेत. त्याची विक्री करून कोट्यवधी रुपये कमावले गेले असतील यात काही शंका राहात नाही. 'नीट' परीक्षांच्या पेपरफुटीचा हा धीटपणा केवळ लाखो रुपयांच्या कमाईतूनच घडत गेला आणि पैशाच्या जोरावर आपण अनेकांची तोंड बंद करू शकतो, अशी मस्तीदेखील अंगामध्ये भिनली पाहिजे. महाराष्ट्रातील ही तीन धेंडे तीन-चार वर्षांपासून असाच धुमाकूळ घालत असली पाहिजेत. अगदी नाशिकमधील शुभम खैरनारने दहा लाख रकमेत घेतली आणि पंधरा लाखांना विकली असेल तर तो या सगळ्यात किती सराईत झाला असेल याचेदेखील अंदाज येतात.

चांगले डॉक्टर्स घडणे किंवा घडविणे हे किती जिकिरीचे काम झाले आहे आणि त्याची सुरूवात 'नीट'च्या पेपरफुटीपासूनच कशी होते हे ठळकपणाने लक्षात येते. सगळाच पैशांचा खेळ असल्याने परीक्षांसाठी मोजावे लागणारे पैसे आणि नंतर वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णांची केली जाणारी लूट या एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात. महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाला तर या गोष्टीचा थांगपत्ताही नव्हता. कदाचित त्यांच्या संमतीनेसुद्धा हा सगळा व्यवहार सुरळीतपणे चालत असला पाहिजे. ज्या ज्या गोष्टी समाजविघातक आहेत किंवा एकूणच समाजव्यवस्थेला कायदा सुव्यवस्थेला नख लावणारे आहेत. त्याच्यावर नजर ठेवण्याचे काम राज्याच्या गुप्तचर यंत्रणा करत असतात. केवळ गुन्हेगारी दहशतवादी कारवायाच शोधणे एवढेच त्यांचे काम राहिलेले नाही. अशोक खरातपासून ते मोटेगावकरांपर्यंत अनेक समाजकंटक याच समाजव्यवस्थेला आणि कायदा व्यवस्थेला धक्का पोहोचवत असतात. मात्र, त्याची माहिती गुप्तचर यंत्रणांपर्यंत पोहोचू नये किंवा पोहोचली तरी सोयीस्करपणे कानाडोळा करण्याचा प्रकार तितकाच गंभीर ठरतो. या चांडाळचौकटीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांचीही झाडाझडती घेतली गेली पाहिजे. विकसित महाराष्ट्राचे ढोल बडवत असताना या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सध्या खासगी क्लासेसचे प्रस्थ माजले आहे. शाळांपेक्षाही क्लासेस अधिक महत्त्वाच्या भूमिका पार पाडतात. शाळांचे आणि क्लासेसचे टायअप असते. म्हणजे अभ्यास करून घेण्याची जबाबदारी क्लासेसवरच टाकली जाते. त्यासाठी पालकांना क्लासेसची लाखो रुपये फी मोजावी लागते. शाळा मात्र सहिसलामत राहतात.

# सोने ३ लाख, तर चांदी ५ लाखांच्या पुढे जाणार

## रॉबर्ट कियोसाकी यांच्या नव्या भविष्यवाणीने वाढविली चिंता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रॉबर्ट कियोसाकी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये दिग्गज मार्केट ॲनालिस्ट 'जिम रेकॉर्ड्स' यांच्या हवाल्याने म्हटले आहे, की येणाऱ्या काळात सोने एक लाख डॉलर प्रति औंस या ऐतिहासिक पातळीवर पोहोचू शकते. तर चांदी देखील २०० डॉलर प्रति औंस या ऑल-टाइम हाय लेव्हलला स्पर्श करेल.

**'बाजार कोसळणार हे निश्चित!' - कियोसाकी**

कियोसाकी यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे, की 'मार्केटमध्ये मोठी घसरण होणे निश्चित आहे. जिम रेकॉर्ड्स यांचा अंदाज आहे की सोने एक लाख डॉलरवर पोहोचेल. सध्या सोन्याची किंमत सुमारे ४,५०० डॉलरच्या आसपास आहे. तसेच मला वाटते, की चांदी२०० डॉलर प्रति औंसवर जाईल, जी सध्या ७५ डॉलरवर आहे.'

कियोसाकी यांचे हे वक्तव्य अतिशय महत्त्वाच्या वेळी आले आहे, जेव्हा जागतिक



बाजारपेठ आधीच वाढता भू-राजकीय तणाव, सातत्याने वाढणारी महागाई, देशांवरील वाढते सरकारी कर्ज आणि केंद्रीय बँकांच्या धोरणांबाबतच्या अनिश्चिततेचा सामना करत आहे. यासोबतच त्यांनी बिटकॉइन देखील सात लाख पन्नास हजार डॉलरवर पोहोचणार असल्याचा दावा केला आहे.

**जग नेमके कोणत्या दिशेने चालले आहे?**

कियोसाकी यांच्या या इशाऱ्यामुळे जग एका मोठ्या आर्थिक बदलाच्या दिशेने वाटचाल करत आहे का, या चर्चेला उधाण आले आहे. हा आर्थिक बदल गुंतवणूकदारांना अखेर सुरक्षित आणि ठोस मालमत्तेकडे वळण्यास भाग पाडू शकतो.

गुंतवणूकदारांना सल्ला देताना कियोसाकी म्हणाले, "सर्वोत्तम गुंतवणूकदार तेच असतात जे भविष्य आधीच पाहू शकतात आणि त्यानुसार पावले उचलतात. लक्षात ठेवा, या आर्थिक मंदीत किंवा घसरणीत तुम्हाला बळी ठरण्याची गरज नाही. उलट या परिस्थितीचा फायदा घेऊन तुम्ही अधिक श्रीमंत होऊ शकता." गेल्या अनेक वर्षांपासून कियोसाकी सातत्याने केवळ कागदी चलनावर (करन्सी) किंवा पारंपरिक वित्तीय माध्यमांवर अवलंबून राहण्याऐवजी सोने, चांदी आणि बिटकॉइनसारख्या प्रत्यक्ष व ठोस मालमत्तेत गुंतवणूक करण्याचा आग्रह धरत आहेत. त्यांच्या या नवीन विधानाने त्यांच्या जुन्या विचारांना पुन्हा एकदा बळकटी दिली आहे.

**इतर मार्केट एक्सपर्ट्सचे मत काय आहे?**

वाढता भू-राजकीय तणाव आणि देशांवर वाढणारे कर्ज पाहता काही मार्केट तज्ज्ञ कियोसाकी यांच्या विधानाशी अंशतः सहमत आहेत की आगामी काळात सोने आणि चांदीच्या दरात वाढ सुरूच राहील. मात्र, काहींनी कियोसाकी यांच्यावर टीकाही केली आहे. कारण ते गेल्या अनेक वर्षांपासून बाजार कोसळण्याची एकसारखीच भाकिते करत आले आहेत.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि वर्ल्ड बँक यांच्या ताज्या अहवालानुसार जागतिक स्तरावर सरकारी कर्ज १०० ट्रिलियन डॉलरच्या पार गेले आहे, जे जगाच्या एकूण जीडीपीच्या जवळपास ९४ टक्के आहे. सध्या अमेरिका, जपान, सुदान आणि सिंगापूरसारखे अनेक मोठे देश प्रचंड कर्जाच्या खाईत अडकले आहेत.



## डिझेल टंचाईचा भडका!

# अमळनेरात संतप्त शेतकऱ्यांनी रोखले वाळूचे डंपर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यात सुरू असलेल्या डिझेल व पेट्रोल टंचाईचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी वर्गाला बसत असताना अमळनेरमध्ये मात्र वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरांना सहज डिझेल उपलब्ध होत असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन छेडले. डिझेलअभावी शेतीपूर्व मशागतीची कामे ठप्प झाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत वाळू वाहतूक करणारी अवजड वाहने अडवून प्रशासनाविरोधात रोष व्यक्त केला. अमळनेर तालुक्यात सध्या अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा तुटवडा जाणवत असून शेतकऱ्यांना तास न तास रांगेत उभे राहूनही डिझेल मिळत नसल्याची परिस्थिती आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेती मशागतीची कामे रखडल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरांना कोणत्याही अडथळ्याशिवाय सतत डिझेल पुरवठा होत असल्याचे चित्र समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर माजी सभापती शाम अहिरे यांच्या नेतृत्वाखाली असंख्य शेतकरी आक्रमक झाले. त्यांनी रात्रीच्या वेळी वाळू वाहतूक करणारे डंपर थांबवत प्रशासनाला जाब विचारला, "शेतकऱ्यांना डिझेल नाही म्हणून शेतीची कामे थांबली आहेत, मग वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरांना नंबर न लावता सहज डिझेल कसे मिळते?" असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांनी प्रशासनावर दुहेरी निकष लावल्याचा आरोप करत तातडीने डिझेल पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला. या घटनेमुळे अमळनेर परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

# शेतकऱ्यांना डिझेल टंचाई, तर वाळू माफियांना रात्री पुरवठा? पंप चालकांवर कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शेतकऱ्यांना डिझेल नाकारून रात्री चोरून लपून लाईट बंद करून अवैध वाळू वाहतुकदारांना डिझेल देणाऱ्या पंप चालकांवर कारवाई करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन अनंत निकम यांनी उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे व तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना दिले आहे.डिझेलचा हा काळाबाजार महसूल पुरवठा विभाग आणि कायदा सुव्यस्थेला आव्हान देणारा आहे. जगाचा पोशिंदा बळीराजा डिझेलसाठी रात्रंदिवस हेलपाट्या मारत असताना मात्र वाळू



वाहतुकदारांना रात्री डिझेल दिले जाते म्हणजे पंप चालक आणि अवैध वाळू व्यवसायिक यांचे संगनमत आहे. त्यामुळे अमळनेर तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांचे ३० दिवसांचे फुटेज तपासण्यात यावेत , ज्यांचे फुटेज मिळणार नाहीत त्यांच्यावर पुरावे नष्ट केले म्हणून गुन्हे दाखल करावेत , रात्री लाईट बंद करून वाळू वाहतुकदारांना कॅन मध्ये डिझेल देणाऱ्या पंप चालकांवर अत्यावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत , शेतकऱ्यांना ओळखपत्र तपासून ,वाहन तपासून डिझेल देण्यात यावे , तालुक्यात विशेष पथक नेमून डिझेल गैरव्यवहार आणि अवैध वाळू वाहतूकीवर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी देखील करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे.

# गो-तस्करीवर पोलिसांचा अंकुश; ५ महिन्यांत १० गुन्हे, ४२ गुरांची सुटका

**पान १ वरून**

निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, गुप्त माहितीच्या आधारे तसेच सतर्क पथकांच्या मदतीने या कारवाया यशस्वी करण्यात आल्या. दरम्यान, गुरे चोरीच्या घटनांकडेही पोलिसांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. एप्रिल व मे महिन्यात दोन गुरे चोरीच्या घटना घडल्याची नोंद आहे. काही अशिक्षित त्यांची गुरे चोरीस गेल्यानंतरही गुन्हा दाखल करत नाहीत. काहींवर दबाव असतो. काही जण आशावादी असतात. आज ना उद्या आपली गुरे आपल्याला परत मिळतील. असे त्यांना वाटते. त्यामुळेही ते गुन्हे नोंदवत नाहीत. दरम्यान गुरे चोरींच्या घटनांचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. स्थानिक नागरिकांकडून या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, गो-तस्करीसारख्या बेकायदेशीर प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने अशीच कठोर भूमिका कायम ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# घरात घुसून १२ वर्षीय बालिकेचा विनयभंग

## पोक्सो अंतर्गत गुन्हा,विनयभंग करणाऱ्या नराधमाला ९ तासांत बेड्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर शहरातील एका भागात १२ वर्षीय अल्पवयीन बालिकेचे तोंड दाबून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची अत्यंत संतापजनक आणि घृणास्पद घटना उघडकीस आली आहे. घरात कोणी नसताना घरात घुसून नराधमाने बालिकेचा विनयभंग केला. मात्र, बालिकेच्या आजीने ऐनवेळी घराचा दरवाजा उघडल्याने पुढील अनर्थ टळला. या खळबळजनक घटनेनंतर अमळनेर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवून अवघ्या नऊ तासांच्या आत नराधम आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.प्राप्त माहितीनुसार, १२ वर्षे ९ महिने वयाची पीडित बालिका रविवार, २४ मे २०२६ रोजी रात्री तिच्या आजीसोबत जेवण करून एकाच खाटेवर झोपली होती. सोमवार, २५ मे २०२६ रोजी सकाळी ६:०० वाजेच्या सुमारास आजी काही कामानिमित्त घराबाहेर पडली होती आणि घराचा दरवाजा बंद होता. याच संधीचा फायदा घेऊन परिसरातच राहणारा संशयित आरोपी शिळ्या उर्फ साहिल शेख (रा. अमळनेर) हा बेकायदेशीरपणे घरात घुसला. तो पीडित बालिकेच्या खाटेवर झोपला आणि तिच्या शरीराला अयोग्य स्पर्श करू लागला.

आजीने त्याला जागीच पकडून "माझ्या घरात काय करत होतास?" असे विचारत त्याला चापट मारली. मात्र, नराधमाने आजीला जोराचा धक्का देऊन तिथून पळ काढला. या धसक्यातून सावरल्यानंतर आजीने विचारपूस केली असता पीडितेने घडलेला सर्व प्रकार रडत-रडत सांगितला. त्यानंतर नातेवाईकांना बोलावून कुटुंबाने थेट अमळनेर पोलीस ठाणे गाठले.

पीडित बालिकेने दिलेल्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो कायदा) प्रमाणे गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच म्हणजेच २५ मे २०२६ रोजी रात्री संशयित नराधम आरोपी शिळ्या उर्फ साहिल रफिक शेख याला शिताफीने अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड करत आहेत.







हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# डॉक्टर की नौकरी छोड़ इस शख्स ने शुरू किया ऐसा बिजनेस

## आज लाखों में कर रहा कमाई, बताई सफलता की कहानी

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज के दौर में जहां युवा सुरक्षित नौकरी को ही करियर का आधार मानते हैं, वहीं कुछ लोग जोखिम उठाकर अपनी अलग पहचान बना रहे हैं। बुंदेलखंड के चित्रकूट से एक ऐसी ही प्रेरणादायक कहानी सामने आई है, जहां एक पशु चिकित्सक ने नौकरी छोड़कर कुक्कुट पालन को अपनाया और आज वह लाखों का कारोबार खड़ा कर चुके हैं। इसके साथ ही नौकरी से चार गुना ज्यादा पैसा भी कमा रहे हैं।

**७० लाख रुपए का लिया लोन**

हम बात कर रहे हैं चित्रकूट के मऊ तहसील पियरा गांव के रहने वाले डॉ. पुष्पेंद्र सिंह की, जिन्होंने कुक्कुट पालन अपनाया है। वह मुर्गियों के अंडों को बाहर बेचकर पहले से चार गुना अधिक पैसा कमा रहे हैं। मुर्गी पालन करने वाले डॉ. पुष्पेंद्र सिंह ने नौ साल तक हरियाणा और उन्नाव में निजी पशु चिकित्सा के रूप में काम किया, लेकिन मिलने वाले पैसे से वह संतुष्ट नहीं थे। इसके बाद उन्होंने नौकरी छोड़ने का फैसला उठा लिया था। वह अपने घर आ गए, इसके बाद उन्होंने खुद का सेटअप शुरू करने के लिए




उत्तर प्रदेश कुक्कुट विकास नीति २०२२ के तहत ७० लाख रुपए का इंडियन बैंक से लोन ले लिया।

**१२००० मुर्गियां पालने का प्रोजेक्ट**

डॉ. पुष्पेंद्र सिंह ने लोकल १८ को जानकारी में बताया कि पहले वह डॉक्टर की नौकरी करते थे, लेकिन नौकरी में उनको ज्यादा पैसा ना मिलने के कारण उन्होंने बिजनेस करने के लिए ठानी। साल २०२३ में पिता के खत्म हो जाने के बाद वह अपने घर वापस आ गए थे। कुछ दिन बाद उन्होंने बैंक से ऋण लेकर १२००० मुर्गियां पालने का प्रोजेक्ट शुरू किया। इस प्रोजेक्ट से अब उनका फार्म हाउस प्रतिदिन लगभग ११४०० अंडों का उत्पादन करता है।

**अब खोलेंगे दूसरा कुक्कुट पालन**

उन्होंने बताया कि मेरा वार्षिक कारोबार लगभग १ करोड़ ५० लाख रुपए है, जिसमें से २५ लाख रुपए की शुद्ध आए हो रही है। उनका कहना है कि उनको यह करते हुए अभी एक साल ही हुआ है। अंडे की डिमांड इतनी ज्यादा है कि लगभग १ साल बाद वह दूसरा कुक्कुट पालन भी खोलेंगे। कुक्कट पालन में लगभग १० लोगों को रोजगार भी दिए हुए हैं। हर तीन से चार दिनों में वह अंडों को बाहर बेच देते हैं। उन्होंने आगे की जानकारी में बताया कि कुक्कट विकाश नीति के तहत लोन लेने से उनको ७ टक्के की सब्सिडी भी मिली है।

# ‘नवतपा’च्या ९ दिवसांत ‘या’ भाजीपासून राहा लांब

## नाहीतर आरोग्याबाबत करावा लागेल पश्चाताप!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोमवार, दि. २५ मेपासून सुरू झालेला ‘नवतपा’चा कालावधी २ जूनपर्यंत असणार आहे. या ९ दिवसांत तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसवरपर्यंत पोहोचू शकतो. अशा परिस्थितीत स्वतःला निरोगी ठेवण्यासाठी ‘नवतपा’च्या कालावधीत काही गोष्टींचा ‘डाएट’मध्ये समावेश करावा तर काही पदार्थ आवर्जून टाळावेत. यापैकीच एक भाजी म्हणजे वांगे. ‘नवतपा’च्या दिवसांत वांगी खाणे का टाळावे? याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊया.



**‘नवतपा’मध्ये वांगी का खाऊ नये? वांग्याची प्रकृती कशी असते?**

उत्तर : आयुर्वेदानुसार वांगे हे उष्ण प्रकृतीचे असते.

**‘नवतपा’त वांगी का खाऊ नये?**

जर तुम्ही या ९ दिवसांत वांग्याचा आहारात समावेश केला, तर शरीरात उष्णता निर्माण करू शकते. ज्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

**वांगी खाल्ल्याने कोणत्या समस्या उद्भवू शकतात?**

‘नवतपा’च्या काळात वांग्याचे सेवन केले, तर ॲसिडिटी (पित्त), अस्वस्थता आणि पोटात जळजळ यासारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

या दिवसांत वांगी खाल्ल्याने त्वचेशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात. उदा.- अंगावर लाल चट्टे येणे, फोड येणे किंवा खाज सुटणे. ‘नवतपा’च्या काळात उष्ण आणि पचायला जड असलेले अन्नपदार्थ पचण्यासाठी जास्त वेळ लागतो. अशा परिस्थितीत जर तुम्ही वांगी खाल्ली तर तुम्हाला अपचन आणि उलट्यांसारखा त्रास होऊ शकतो.

**‘नवतपा’च्या दिवसांत काय खावे?**


या दिवसांत कलिंगड, काकडी, लिंबू-पाणी, हंगामी फळे आणि ताक यासारख्या गोष्टींचे सेवन करणे फायदेशीर मानले जाते.

# डी मार्टमध्ये घरगुती उपयोगी वापराच्या ‘या’ वस्तू कधीच मिळत नाहीत, त्यामाग आहे चलाखी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डी मार्टमध्ये दिवसेंदिवस ग्राहकांची गर्दी वाढत आहे. सणासुदीचे दिवस असो किंवा आपल्याला दररोज घरगुती वापरासाठी लागणारा किराणा माल खरेदी करण्यासाठी तुमच्या-आमच्या सारखे लोक डी मार्टकडे वळतात, पण तुम्ही कधी विचार केला का की डी मार्ट स्टोअरच्या शेल्फवर काही वस्तू गायब असतात ज्यासाठी तुम्हाला वेगळ्या ठिकाणी पायपीट करावी लागते. डी मार्ट काही विशिष्ट वस्तू मुद्दामहून साठवून ठेवत नाहीत; त्याऐवजी, प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात खपणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंवर लक्ष केंद्रित करते.



देशभरातील शेकडो डी मार्ट दुकानात परवडणाऱ्या दरात घरगुती वापराच्या वस्तू, किराणा सामान, कपडे आणि इतर गरजेच्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध असल्यामुळे येथे खरेदीचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. पण डीमार्टमध्ये जवळजवळ सर्वच गोष्टी मिळतात असा तुमचा समज असेल तर काही महत्त्वाच्या गोष्टी किंवा वस्तू मुद्दाम उपलब्ध करून दिल्या जात नाही.

डी मार्टमध्ये शॉपिंग करताना कदाचित तुमच्या लक्षात आलं असेल की येथे ताजे मांसाहारी पदार्थ मिळत नाही. काही ठिकाणी फ्रोजन मांसाहारी पदार्थ जसे की कोंबडी, मासळी किंवा अंडी मर्यादित प्रमाणात उपलब्ध असताना पण, डी मार्टमध्ये ताजे मांस, मासे किंवा चिकन विक्रीसाठी उपलब्ध नसतात. स्वच्छता, साठवणूक आणि लॉजिस्टिकची जबाबदारी यामागची कारणे मानली जातात.

याशिवाय सर्वसामान्यांच्या पसंतीस उतरलेल्या डी मार्टमध्ये ताज्या भाज्या जसे की पालक, मेथी, कोथिंबीर इत्यादींसारख्या नाशवंत हिरव्या पालेभाज्या आणि कच्च्या भाज्या सहसा ठेवल्या जात नाही. हिरव्या पालेभाज्या लवकर खराब होतात त्यामुळे, दररोज त्यांची गुणवत्ता टिकवणे आणि मोठ्या प्रमाणात साठवणूक करणं कठीण असतं त्यामुळे डी मार्ट अशा गोष्टी उपलब्ध करून देत नाही.

डी मार्टमध्ये विक्स वेपोरब,टायगर बाम किंवा साध्या गोळ्यांचा मुबलक साठा उपलब्ध आहे, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर औषधे म्हणजे फार्मसी सेवा मिळत नाही.

याशिवाय डी मार्टमध्ये मोठमोठ्या इलेक्ट्रोनिक्स वस्तूही तुम्हाला मिळणार नाही. डी मार्ट केवळ गृहपयोगी वस्तूंचे ठिकाण आहे त्यामुळे तिथे केवळ ठराविक वस्तू किंवा गोष्टी मिळत असल्यामुळे टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन यासारख्या जास्त किंमत असलेल्या इलेक्ट्रोनिक्स वस्तूंची विक्री होत नाही. डीमार्ट केवळ दररोजच्या वापरातील वस्तूंचा पुरवठा करण्यावर लक्ष केंद्रित करते त्यामुळे इतर महागड्या किंवा मोठ्या गुंतवणुकीपासून दूर राहते.

राधाकिशन दमानींनी सुरू केलेले डी मार्ट केवळ गृहपयोगी आणि दररोजच्या वपसारासाठी गरजेच्या वस्तू किंवा गोष्टी पुरते. तुम्ही डी मार्टमध्ये मांसाहारी पदार्थ (मांस, कोंबडी आणि मासे), मद्य आणि ताजी दुग्धजन्य उत्पादने शोधण्यात आपला वेळ वाया घालवू नका; कारण त्यांच्याकडे ही वरील पदार्थ उपलब्ध नसतात.

।। सहकारातून समृद्धीकडे ।।
कै. हरी आण्णा निंबाजी पाटील
कै.खुशाल यादव पाटील
अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ ली.
पंचवार्षिक निवडणूक 2025-30
वि.का.सोसायटी मतदारसंघातील सहकार पॅनलचे अधिकृत उमेदवार...
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: भामरे गणेश धर्मराज — पोलीस पाटील, बाम्हणे, ता.अमळनेर; चेअरमन, बाम्हणे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. — निशाणी
अ.क्र. ५ — उमेदवाराचे नांव: पाटील नितीन बापूराव — संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; लोकनियुक्त सरपंच, गडखांब, ता.अमळनेर — निशाणी
अ.क्र. ६ — उमेदवाराचे नांव: पाटील पंकज शांताराम — लोकनियुक्त सरपंच, निमझरी, ता.अमळनेर; चेअरमन, निमझरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. — निशाणी
अ.क्र. ७ — उमेदवाराचे नांव: पाटील सचिन बाळू — संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; लोकनियुक्त सरपंच, अंतुर्ली-रंजाणे, ता.अमळनेर — निशाणी
अ.क्र. ८ — उमेदवाराचे नांव: पाटील संजय त्र्यंबक — संचालक, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चौबारी; कार्यवाहक, ग्रंथालय संघ, जळगाव — निशाणी
सोसायटी मतदारसंघात आपणास पाच मत देण्याच्या अधिकार आहे.
मतदान - शनिवार 30 मे 2026
स. 8.00 ते सायं. 04.00 पर्यंत
ठिकाण :
साने गुरुजी शाळा अमळनेर
तरी..." कपबशी " चिन्हासमोरील बटन
दाबुन प्रचंड बहुमतांनी विजयी करावे... ही नम्र विनंती...!
प्रकाशक :
भागवत पाटील ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर
अशोक पाटील सभापती, कृ.उ.बा.समिती, अमळनेर
प्रा.सुरेश पाटील विधानसभा क्षेत्रप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेस,अमळनेर
सुनिल पवार मा.अध्यक्ष, आत्मा कमिटी, अमळनेर
मुद्रक : वर्धमान, प्रति : 1000

अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ ली.
पंचवार्षिक निवडणूक 2025-30
व्यक्तिशा: मतदारसंघातील सहकार पॅनलचे अधिकृत उमेदवार...
कै. हरी आण्णा निंबाजी पाटील
कै.खुशाल यादव पाटील
सहकार पॅनल
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: बागूल दिपक जगतराव (मंगरुळ) — माजी व्हा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर — निशाणी
अ.क्र. ६ — उमेदवाराचे नांव: पाटील चंद्रकांत वसंत — माजी सरपंच, ग्रा.प. पिंगळवाडे (चकाअप्पा)(पिंगळवाडे) — निशाणी
अ.क्र. १० — उमेदवाराचे नांव: पाटील संभाजी लोटन — मा.संचालक, कृ.उ. बाजार समिती, अमळनेर (लोण) — निशाणी
अ.क्र. १२ — उमेदवाराचे नांव: पाटील संजय पुनाजी — मा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (पिंपळे) — निशाणी
अ.क्र. १७ — उमेदवाराचे नांव: शिसोदे अनिल शिवदास — मा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (प्र.डांगरी) — निशाणी
महिला मतदारसंघ
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: देसले सुषमा वासुदेव — संचालिका, कृ.उ. बाजार समिती, अमळनेर (दहिवद) — निशाणी
अ.क्र. २ — उमेदवाराचे नांव: पाटील मालुबाई बापुराव — गुणवंत पाटील यांच्या मातोश्री (झाडी) — निशाणी
ओ.बी.सी. मतदारसंघ
अ.क्र. २ — उमेदवाराचे नांव: पाटील विक्रांत भास्कर — सेक्रेटरी, अमळनेर तालुका मराठा समाज (अमळनेर) — निशाणी
एस.सी./एस.टी मतदारसंघ
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: बैसाणे शंकर बंडू (बैसाणे सर) — निवृत्त मुख्याध्यापक, प्रताप हायस्कूल, अमळनेर (देवळी) — निशाणी
एन.टी. मतदारसंघ
अ.क्र. ३ — उमेदवाराचे नांव: पाटील रणजित भिमसिंग — माजी शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अमळनेर (अमळनेर) — निशाणी
सन्माननीय मतदार बंधू-भगिनींना नम्र विनंती की, आम्ही अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ लि. अमळनेर पंचवार्षिक निवडणुक 2025-30 च्या निवडणुकीत सदस्य पदासाठी सहकार पॅनल तर्फे निवडणूक लढवीत आहोत... तरी आपले बहुमोल मत सहकार पॅनलच्या सर्व उमेदवारांच्या " कपबशी " या चिन्हाला फुलीचा शिक्का मारुन प्रचंड मतांनी विजयी करा ही नम्र विनंती.
शनिवार, 30 मे 2026 स. 8.00 ते सायं. 4.00 पर्यंत | ठिकाण : साने गुरुजी शाळा अमळनेर
प्रकाशक : भागवत पाटील ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर अशोक पाटील सभापती, कृ.उ.बा.समिती, अमळनेर प्रा.सुरेश पाटील विधानसभा क्षेत्रप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेस,अमळनेर सुनिल पवार मा.अध्यक्ष, आत्मा कमिटी, अमळनेर
मुद्रक : वर्धमान, प्रति : 1000





# ज्यांच्या यज्ञाने अयोध्येत प्रभू श्रीराम जन्मले त्या ऋष्यशृंग ऋषींच्या पदस्पर्शाने पावन ‘अनसिंग’!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वाशीम जिल्ह्यातील पुसद मार्गावर वसलेले ‘अनसिंग’ हे गाव स्वतःच्या कुशीत रामायण काळातील एक अतिशय समृद्ध, पवित्र आणि ऐतिहासिक वारसा बाळगून आहे. जेव्हा आपण या गावाच्या नावाची पाळेमुळे शोधतो तेव्हा लक्षात येते, की या गावाचे मूळ नाव ‘ऋष्यशृंग’ असे होते. परंतु अनेक शतकांच्या प्रवासात आणि लोकांच्या रोजच्या बोलीभाषेत त्याचे अपभ्रंश होऊन आजचे ‘अनसिंग’ हे नाव रूढ झाले. जर आपण संपूर्ण भारताचा सांस्कृतिक नकाशा पाहिला, तर ऋष्यशृंग ऋषींचा संबंध असणारी मोजकीच पवित्र स्थाने समोर येतात, ज्यामध्ये कर्नाटकातील शृंगेरी जवळील किग्गा, हिमाचल प्रदेशातील कुलू खोऱ्यातील बंजार, उत्तर प्रदेशातील प्रयागराज जवळील शृंगवेरपूर आणि या सर्व महान तीर्थक्षेत्रांच्या पंक्तीत आपल्या महाराष्ट्रातील हे अनसिंग गाव अत्यंत मानाने बसते. या गावाचा आणि येथील मातीचा थेट संबंध रामायणातील एका अत्यंत महत्त्वाच्या कालखंडाशी आणि एका अलौकिक ऋषींच्या जीवनकथेशी जोडलेला आहे.

महर्षी विभंडक यांचे पुत्र असलेल्या ऋष्यशृंग ऋषींची कथा आणि त्यांचे भारतीय संस्कृतीतील महत्त्व अत्यंत अथांग आहे. पुराणातील कथांनुसार एका हरिणीच्या पोटी त्यांचा जन्म झाला आणि त्यांच्या कपाळावर जन्मतःच एक लहानसे शिंग होते. ज्यामुळे त्यांना ‘ऋष्यशृंग’ हे नाव मिळाले. त्यांचे वडील महर्षी विभंडक यांनी या बालकाला मानवी वस्ती, जगातील कपट, प्रलोभने आणि सामान्य स्त्री-पुरुषांच्या संसर्गापासून पूर्णपणे दूर एका घनदाट अरण्यात वाढवले होते. त्यामुळे या ऋषींचे संपूर्ण बालपण आणि तारुण्य केवळ झाडे-वेली, पशू-पक्षी आणि ईश्वरी भक्तीत गेले. त्यांचे अंतःकरण एका निष्पाप बालकासारखे निर्मळ आणि विरक्त होते, ज्यांना स्वतःचे वेगळेपण किंवा जगाच्या रीतीभाती काहीच ठाऊक नव्हत्या.

ऋष्यशृंग ऋषींचे सर्वात मोठे महत्त्व म्हणजे ते खऱ्या अर्थाने निसर्गाचे आणि शुद्धतेचे जिवंत प्रतीक होते. त्यांच्या याच पवित्रतेची आणि कठोर तपश्चर्येची ताकद इतकी अफाट होती की निसर्गही त्यांच्या



पाऊलखुणांचा आदर करायचा. त्यांच्या जीवनप्रवासातील पहिली मोठी घटना म्हणजे अंगादेशाचा दुष्काळ निवारण करणे. अंगादेशाचे महाराज रोमपाद यांच्या राज्यात सलग अनेक वर्षे पाऊस न पडल्यामुळे भीषण दुष्काळ पडला होता, तेव्हा विद्वानांनी सांगितले की जर या परम पवित्र आणि जगाच्या मोहापासून अलिप्त असलेल्या ऋषींचे पाऊल तुमच्या भूमीवर पडले, तरच वरुणदेव प्रसन्न होतील. मोठ्या आदराने जेव्हा ऋष्यशृंग ऋषींना अंगादेशात आणण्यात आले, तेव्हा त्यांच्या पवित्र पावलांचा स्पर्श त्या करपलेल्या मातीला होताच आकाशात काळेभोर ढग दाटून आले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. राजा रोमपाद यांनी कृतज्ञतेने आपली कन्या शांता हिचा विवाह ऋष्यशृंग ऋषींशी लावून दिला. परंतु, या ऋषींचे जागतिक आणि आध्यात्मिक महत्त्व केवळ दुष्काळ निवारणापुरते मर्यादित नव्हते, तर ते थेट प्रभू श्रीरामचंद्रांच्या अवताराशी जोडलेले आहे. अयोध्येचे चक्रवर्ती सम्राट दशरथ महाराज यांना जेव्हा पुत्रप्राप्तीची तीव्र आस होती, तेव्हा संपूर्ण सृष्टीला तारणारा प्रभू श्रीरामांचा जन्म व्हावा म्हणून याच महान ऋषींच्या मुख्य पुरोहितत्वाखाली अयोध्येत ऐतिहासिक ‘पुत्रकामेष्टी यज्ञ’ संपन्न झाला. त्यांच्या मंत्रसामर्थ्यातून आणि अथांग तपोबलातून यज्ञकुंडातून प्रगट झालेल्या प्रसादाने साक्षात प्रभू श्रीराम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांचा जन्म झाला.

म्हणजेच ज्यांच्या यज्ञामुळे संपूर्ण विश्वाला प्रभू श्रीराम लाभले, त्या महान ऋषींचे वास्तव्य आपल्या वाशीमच्या अनसिंग भूमीला लाभले, हे या मातीचे सर्वांत मोठे भाग्य आहे.

आजही अनसिंग येथील मंदिराच्या आवारात पाऊल ठेवले की, आपल्याला त्या पवित्र काळची अनुभूती येते. मंदिराच्या परिसरातील जुने पाषाण, शांत वातावरण, जुनी ऐतिहासिक झाडे आणि गाभाऱ्यात प्रतिष्ठित केलेले ऋष्यशृंग ऋषींचे पवित्र शिवस्वरूप भाविकांचे मन प्रसन्न करते. महाशिवरात्री आणि श्रावण महिन्यासारख्या पवित्र सणांना या मंदिरात मोठी गर्दी होते आणि दूरदूरवरून लोक दर्शनासाठी येतात. मंदिराच्या आवारात असलेले ऐतिहासिक कुंड हे केवळ पाण्याचा साठा नसून परिसरातील लोकांच्या या परंपरेवर असलेल्या अतूट श्रद्धेचे जीवंत केंद्र आहे. या कुंडातील पाण्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते कोणत्याही ऋतूत कधीही आटत नाही, अशी गावकऱ्यांची ठाम श्रद्धा आहे. आजच्या काळातही जेव्हा जेव्हा या संपूर्ण परिसरात पावसाची अडचण येते, पाऊस वेळेवर पडत नाही किंवा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होते, तेव्हा संपूर्ण परिसरातील लोक आणि भाविक अत्यंत आर्ततेने इथे एकत्र येतात. या पवित्र कुंडातील जल कलशांमध्ये भरून ते ऋष्यशृंग ऋषींच्या शिवलिंगावर अतिशय भक्तीभावाने वाहतात आणि मोठ्या आस्थेने जलाभिषेक करतात.

मनात अढळ विश्वास ठेवून जेव्हा भाविक आणि कष्टकरी समाज ऋषींच्या चरणी साकडे घालतो, तेव्हा वरुणराजाची कृपा होते आणि कोरडी पडलेली शेते पुन्हा हिरवीगार होतात, अशी येथील लोकांची पिढ्यानपिढ्यांची भावना आहे. संतती प्राप्तीची इच्छा असणारे दाम्पत्यही या कुंडाचे जलतीर्थ म्हणून अतिशय श्रद्धेने प्राशन करतात. अनसिंगचे हे प्राचीन मंदिर आणि ते पवित्र कुंड म्हणजे केवळ दगड-धोंडे नाही, तर ते मानवी भावना, निसर्गाशी असलेले आपले जुने नाते, ऋषींच्या पवित्र चरित्राचे महत्त्व आणि रामायणकालीन महान इतिहास यांचा एक सुंदर संगम आहे, जो आजही आपल्या विदर्भाच्या मातीत अतिशय शांतपणे श्वास घेत आहे.

## दर्शन झाल्यानंतर मंदिराच्या पायऱ्यांवर किंवा ओट्यावर थोडा वेळच का बसतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आपल्यापैकी बऱ्याच जणांना आपल्या वयस्क किंवा वडीलधाऱ्या लोकांनी कधीतरी सांगितलेले असेलच की मंदिरात दर्शनाला गेल्यानंतर दर्शन करून लगेच निघू नये. मंदिरात काही वेळ बसायला पाहिजे. परंतु तुम्हाला माहिती आहे का या परंपरेमागील मूळ कारण काय आहे?

आजकाल काही लोक दर्शनाला जातात आणि वडीलधाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे पायऱ्यांवर बसतात आणि तेथे बसून व्यावसायिक किंवा राजकीय चर्चा सुद्धा करतात. परंतु ही प्राचीन परंपरा एका विशिष्ट उद्देशासाठी बनवली गेली होती. वास्तविक पाहता आपण सर्वांनी दर्शन घेऊन निघताना किमान श्लोक म्हणायला हवा. जो आजकाल बहुतांश लोकांना माहिती नाही.

**श्लोक पुढीलप्रमाणे –**
**अनायासेन मरणम्, विना देन्येन जीवनम् ।**
**देहांते तव सानिध्यम्, देहि मे परमेश्वरम् ।।**

या श्लोकाचा अर्थ असा आहे, की अनायासेन_ मरणम् अर्थात माझा मृत्यू कोणत्याही पिडे विना म्हणजे त्रासदायक अवस्थेत होऊ नये आणि मी कधीही आजारी होऊन एका जागेवर पडून त्रासदायक अवस्थेत कष्ट उचलून होऊ नये. माझा मृत्यू अगदी चालत-फिरत असतानाच्या अवस्थेत व्हावा.

विना देन्येन जीवनम् अर्थात, माझे जीवन हे सक्तीचे जीवन नसावे, म्हणजे मला कधी कोणाच्या आश्रयाची आवश्यकता पडू नये. जसे की अर्धांगवायू झाल्यानंतर माणूस इतरांवर अवलंबून राहतो, तसे माझे जीवन लाचार बनू नये आणि ईश्वराच्या कृपेने माझे आयुष्य विना भिक्षेचे निघून जावे.

**देहांते तव सानिध्यम्**


अर्थात, मला जेव्हा पण मृत्यू येवो तेव्हा तो मी परमेश्वराच्या समोर असतानाच येवो. जसे पितामह भीष्म यांच्या मृत्यूवेळी भगवान श्रीकृष्ण त्यांच्यासमोर जाऊन उभे राहिले होते आणि त्यांचे दर्शन झाल्यानंतरच भीष्मांचा मृत्यू झाला होता.

देहि मे परमेश्वरम् अर्थात हे परमेश्वरा मला असे वरदान दे. (वरीलप्रमाणे जे मागितले आहे ते) प्रार्थना करताना वरीलप्रमाणे करा आणि लक्षात ठेवा की देवाकडे धन-दौलत, गाडी-बंगला वगैरे मागू नये. कारण त्या व्यक्तीच्या कर्तृत्वानुसार हे त्याला मिळत असते. आपल्याला आपल्या पात्रतेनुसारच देत असतो. यामुळे देव दर्शनानंतर अशीच प्रार्थना करा. आणि ही प्रार्थना आहे, याचना नाही हे लक्षात ठेवा. याचना ही सांसारिक गोष्टींसाठी असते, जसं की धन, घर, व्यापार, नोकरी, संतती सांसारिक सुख किंवा अन्य गोष्टी ही आहे याचना. प्रार्थना म्हणजे निवेदन.

## संतांच्या संगतीचा परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जडीबुटीवाल्याजवळ एक गोळी असते. ज्याच्या अंगात विष भिनले आहे अशा माणसाच्या जखमेवर ती गोळी नुसती ठेवतात. ती सर्व विष शोषून घेते. नंतर तिला धुतली की ती पूर्ववत् होते. त्याचप्रमाणे सत्पुरुषाच्या संगतीत आपले पाप शोषून घेतले जाते, आणि पुनः तो सत्पुरुष स्वतः शुद्धच राहतो. सत्संगती मिळेल, पण ती टिकणे फार कठीण काम आहे. साधारणपणे ज्या विषयाची आपल्याला आवड असते तसलीच संगत आपण बघतो. मीच वाईट म्हणून मी वाईट लोकांची संगत धरतो. विषयात दोष नाही; म्हणजेच, नुसते विषय बाधक होत नाहीत, विषयी लोकांची संगत मात्र फार बाधक असते. संगतीने आपल्यावर बरावाईट परिणाम होतो. विषय मागूनही जो ते देत नाही, त्यांपासून परावृत्त करतो, तो संत. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. ज्याची संगत केली असताना भगवत्प्रेम प्रकट होते तो संत जाणावा. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ



असावी. विषयाची गोडी फार; पण तो सुटावा असे वाटू लागले म्हणजे भजनपूजन करणाऱ्याची संगत धरावी. वाईट विचार मनात आले की नामाची जोड ठेवावी. आपला सर्वाठायी भगवद्भाव वाढू लागला म्हणजे संतांची प्रचीती येते. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. म्हणून संत नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. ते जे गातील तो संगीतातला रागच समजावा. तुकारामबुवा नुसते ‘विठ्ठल विठ्ठल’ म्हणत, पण त्याची गोडी आपल्या गाण्यामध्ये देखील नाही.

खरोखर संतांना आपल्याविषयी इतकी कळकळ असते, आपल्याला ती कळतही नाही. संत आपल्या हिताचे सांगतात, पण आपले मन विषयात वावरत असल्याने त्यांचे बोलणे आपल्या मनात पूर्णपणे ठसत नाही. औषध कडू असले तरी रोग झाल्यावर आपण ते घेतोच ना ? मग प्रपंचातल्या व्याधींनी त्रस्त होऊनही आपण संतांच्या हितकारक बोलण्याकडे का दुर्लक्ष करावे ? ज्याला भगवंताचे अधिष्ठान आहे त्याचे कडक बोलणेसुद्धा कुणाला लागणार नाही. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण आहे, कारण ‘सर्व ठिकाणी मीच आहे’ ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. आईपण जसे सगळीकडे सारखे, त्याचप्रमाणे सर्व संत एकच भाषा बोलतात. संतांनी मिळवलेले पद मिळविण्याचे साधन आपणही करतो; पण त्यांचे करणे निःसंशय असते, तर उलट आपण नेहमी शंकाच व्यक्त करीत असतो. डोळ्यांत खुपणारा खडा काढण्यासाठी त्यात लोणी घालतात; त्याने न खुपता खडा बाहेर पडतो आणि डोळा थंड होतो. त्याचप्रमाणे संतांची वाणी गोड, मऊ, हितकारक असते; तसे आपण बोलावे.आपली भूमिका थोडी तयार असल्यास सत्संगतीचा परिणाम होण्यास वेळ लागत नाही.

## मंत्र आणि जपमाळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जपमाळ आणि मंत्रोच्चार यांच्यातून निर्माण होणारी ऊर्जा ही केवळ श्रद्धा नसून, त्यामागे एक सूक्ष्म लहरींचे शास्त्र आहे.

**१. मंत्रोच्चार आणि ध्वनी ऊर्जा**

प्रत्येक मंत्र हा विशिष्ट अक्षरांचा समूह असतो. जेव्हा आपण मंत्राचा उच्चार करतो, तेव्हा शरीरात आणि वातावरणात विशिष्ट कंपने निर्माण होतात.

**नादब्रह्म :** मंत्राच्या उच्चारणामुळे जिभेची हालचाल होऊन टाळूवरील विशिष्ट बिंदूंवर दाब पडतो, ज्यामुळे मेंदूतील सुप्त केंद्रे जागृत होतात.

**अनुनाद :** "श्री स्वामी समर्थ" किंवा "ॐ" सारख्या मंत्रांच्या उच्चारणाने शरीरातील सात चक्रांवर परिणाम होतो. ही ध्वनी ऊर्जा पेशींच्या स्तरावर जाऊन सकारात्मक बदल घडवून आणते.

**बाह्य मंडल :** मंत्राच्या सततच्या उच्चारामुळे तुमच्याभोवती एक संरक्षणात्मक कवच तयार होते, जे बाहेरील नकारात्मक ऊर्जेला रोखते.

२. **जपमाळ :** ऊर्जेचे संचयन

जपमाळ ही केवळ मोजण्याचे साधन



नसून ती एक 'बॅटरी' सारखे काम करते.

**बोटांच्या टोकांचे घर्षण :** आपल्या हाताच्या बोटांच्या टोकांवर अनेक मज्जातंतू असतात. जेव्हा आपण अंगठ्याने मणी सरकवतो, तेव्हा त्या घर्षणातून 'स्थितिक विद्युत' उत्पन्न होते.

**ऊर्जा चक्र :** मंत्राचा उच्चार (ध्वनी ऊर्जा) आणि बोटांचे घर्षण (स्पर्श ऊर्जा) यांचा मिलाफ होऊन ती ऊर्जा जपमाळेच्या मण्यांमध्ये साठवली जाते.

**रुद्राक्षाचे महत्त्व :** रुद्राक्षामध्ये विद्युत-चुंबकीय गुणधर्म असतात. त्यामुळे तो मंत्राची ऊर्जा वेगाने शोषून घेतो आणि ती पुन्हा साधकाच्या शरीरात प्रवाहित करतो.

## जगन्नाथ पुरीमध्ये एकादशी देवीला उलटे का लटकवले आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवाच्या धाममध्येही एखाद्या देवीला शिक्षा मिळू शकते का? आणि जर मिळाली, तर अशी कोणती चूक होती ज्यासाठी स्वतः जगन्नाथजींना हस्तक्षेप करावा लागला? समुद्राच्या लाटांनी वेढलेले, शंख आणि घंटानादाने भरलेले ते पवित्र धाम, जेथे प्रत्येक श्वासात देव वसतात, ते म्हणजे पुरी आणि तेथे विराजमान आहेत जगन्नाथजी.

येथील परंपरा शतकानुशतके चालत आल्या आहेत. प्रत्येक नियम गाढ विश्वासाशी जोडलेला आहे. पण एक गोष्ट या धामला जगापासून वेगळे करते; ती म्हणजे येथे महाप्रसाद कधीही नाकारला जात नाही. येथे अन्न म्हणजे केवळ अन्न नसून ते साक्षात देवाचे स्वरूप मानले जाते. कोणताही दिवस असो, कोणतेही व्रत असो, पुरीतील भक्त महाप्रसाद ग्रहण करणे कधीही सोडत नाहीत.

दुसरीकडे संपूर्ण जगात एकादशीचे व्रत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या दिवशी भक्त अन्न त्यागून देवाचे स्मरण करतात. या व्रताच्या अधिष्ठात्री आहेत ‘एकादशी देवी’. असे म्हटले जाते, की जो कोणी निष्ठेने एकादशीचे व्रत करतो त्याला देवाची विशेष कृपा मिळते. एके दिवशी एकादशी देवीच्या मनात विचार आला, ‘सगळ्या जगात लोक माझे व्रत



पाळतात, पण पुरीमध्ये असेच घडते का?’ त्यांची जिज्ञासा वाढत गेली आणि त्यात अहंकाराचा अंशही मिसळला गेला. त्यांनी ठरवले, की ‘मी स्वतः जाऊन पाहते की तेथे खरा भक्त कोण आहे?’ त्यांनी आपले दिव्य रूप त्यागले आणि एका वृद्ध स्त्रीचे रूप धारण केले. रात्रीच्या वेळी त्या पुरीच्या गल्ल्यांमध्ये फिरू लागल्या. सगळीकडे भजनाचे सूर उमटत होते, पण त्यांना एक गोष्ट अस्वस्थ करून गेली; अनेकांच्या घरात लोक भोजन करत होते.

त्यांना वाटले, ‘आज एकादशी आहे, तरीही हे लोक अन्न कसे ग्रहण करत आहेत?’ त्या एका घरापाशी गेल्या आणि काही खायला मागितले. घरच्या लोकांनी त्यांना आदराने महाप्रसाद दिला. त्या वृद्धेच्या रूपात असलेल्या देवीने विचारले, की ‘आज एकादशी आहे, व्रत का करत नाही?’ घरचे प्रमुख हसून म्हणाले, ‘माताजी, आम्ही व्रताचा आदर करतो, पण पुरीमध्ये महाप्रसाद हे साक्षात देवाचे रूप आहे आणि देवाला कधीही नाकारले जात नाही.’

देवीला हा अनुभव अनेक घरांमध्ये आला. त्यांचा संशय रागात बदलला. त्यांना वाटले, ‘हे लोक माझ्या व्रताचा अनादर करत आहेत, यांना शिक्षा मिळालीच पाहिजे.’ तेव्हाच तेथे साक्षात जगन्नाथजी प्रकट झाले. त्यांनी विचारले, ‘देवी, हे काय करत आहात?’

एकादशी देवी रागात म्हणाली, ‘प्रभू, हे लोक माझ्या व्रताचा अपमान करत आहेत.’ जगन्नाथजी शांतपणे म्हणाले, ‘देवी, तू व्रत पाहत आहेस, पण मी भक्ताचा ‘भाव’ पाहत आहे.’ जेव्हा जगन्नाथजींनी त्यांना भक्तांचे ते प्रेम आणि भाव दाखवला तेव्हाही देवीचा अहंकार शांत झाला नाही.

शेवटी जगन्नाथजींनी आपला हात उंचावला आणि म्हणाले, ‘तू भक्तीला नियमात बांधले आहेस आणि जेथे भक्ती बंधनात असते, तेथे अहंकार जन्म घेतो.’ क्षणार्धात वातावरणात बदल झाला आणि एकादशी देवीचे स्वरूप उलटे झाले. त्यांचे डोके खाली आणि पाय वर अशा अवस्थेत त्या हवेत लटकू लागल्या. देवीला आपली चूक उमजली. त्यांनी क्षमा मागितली. तेव्हा जगन्नाथजी म्हणाले, ‘जेव्हापर्यंत हे जग राहील, तेव्हापर्यंत तुझे हे रूप लोकांना आठवण करून देईल, की व्रतापेक्षा प्रेम श्रेष्ठ असते.’ असे मानले जाते, की आजही पुरीमध्ये एकादशीचे स्वरूप उलटे दर्शविले जाते. जेणेकरून प्रत्येक भक्ताला कळावे की देवाला नियमात नाही, तर प्रेमात शोधले पाहिजे.

## ‘कर्माचे खाते’ नेमके कसे चालते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निसर्गाच्या या अथांग विश्वात जसे बँकांचे हिशेब असतात, पैशांचे व्यवहार चालतात, अगदी तसेच एक अदृश्य पण अत्यंत अचूक खाते चालत असते ते म्हणजे ‘कर्माचे खाते’.

जगातील इतर बँकांमध्ये पैशांचा घोटाळा होऊ शकतो, तांत्रिक चुका होऊ शकतात किंवा वशिल्याने हिशेब बदलला जाऊ शकतो. परंतु कर्माच्या या खात्यात निसर्गाचा एक डिजिटल नव्हे, तर ‘डिव्हाइन’ (दैवी) नियम चालतो. जेथे प्रत्येक चांगल्या-वाईट कर्माची नोंद अगदी सेकंदाच्या भागासह ठेवली जाते.

आपण आयुष्यात जे काही पेरतो तेच शेवटी उगवते. बऱ्याचदा मानवाला असे वाटते, की आपण पडद्याआड किंवा अंधारात केलेले पाप कोणालाही दिसलेले नाही. परंतु निसर्गाचे सीसीटीव्ही कॅमेरे सदैव सुरू असतात. कर्माचे हे खाते केवळ माणसा-माणसांमधील व्यवहारापुरते मर्यादित नाही. या खात्यातील सर्वांत मोठे आणि महत्त्वाचे पान म्हणजे आपली मुक्या प्राण्यांबद्दल आणि पक्ष्यांबद्दलची वर्तणूक.

माणूस हा बुद्धीवान प्राणी आहे. तो स्वतःचे दुःख शब्दांत मांडू शकतो, अन्यायाविरुद्ध न्यायालयात दाद मागू शकतो. परंतु ज्यांना देवाने आवाज दिला नाही त्या मुक्या जीवांचे काय? रस्त्यावर उन्हातान्हात फिरणारे भटके कुत्रे, झाडावर पाण्यासाठी व्याकुळ झालेले पक्षी किंवा चाऱ्यावर जगणारी जनावरे. या मुक्या जीवांच्या डोळ्यांतील अश्रू आणि त्यांच्या पोटची भूक थेट कर्माच्या खात्यावर परिणाम करते. जेव्हा तुम्ही उन्हाळ्यात एखाद्या पक्ष्यासाठी घराच्या गच्चीवर पाण्याचे भांडे ठेवता किंवा रस्त्यावरील एखाद्या भुकेल्या, असहाय्य कुत्र्याला मायेने भाकरीचा तुकडा टाकता तेव्हा कर्माच्या खात्यात ‘पुण्याचा’ असा काही मोठा साठा जमा होतो जो तुमच्या आयुष्यातील अनेक संकटे नकळत दूर करतो.

या कर्माच्या खात्याचा थेट संबंध ‘दया आणि करुणे’शी आहे. दया ही केवळ माणसांवर दाखवायची नसते, तर ती चराचरात असणाऱ्या प्रत्येक जीवावर दाखवायची असते. प्राण्यांना मानवी कायदे समजत नाहीत, त्यांना फक्त प्रेमाची आणि भीतीची भाषा समजते. आपण जर त्यांच्यावर क्रूरता दाखविली, त्यांना मारहाण केली किंवा त्यांच्या हक्काचे काही हिरावून घेतले, तर त्या मुक्या जीवाच्या अंतःकरणातून निघालेला सुस्कारा किंवा ‘हाय’ (शाप) कर्माच्या खात्यात खूप मोठे ऋण (कर्ज) लिहून जातो. हे कर्माचे कर्ज माणसाला याच जन्मात, कोणत्या ना कोणत्या रूपात व्याजासह फेडावे लागते कधी आजारपणाच्या रूपात, कधी मानसिक त्रासाच्या रूपात, तर कधी आर्थिक नुकसानीच्या रूपात.

आजच्या जगात माणसांची विश्वासार्हता संपत चालली आहे, चारित्र्याचा ऱ्हास होत आहे. अशा वेळी निःस्वार्थ प्रेम काय असते, हे आपल्याला हे मुके जीव शिकवतात. तुम्ही माणसाला कितीही दिले तरी तो वेळ पडल्यावर बदलू शकतो, पण एखादा कुत्रा त्याला दिलेल्या एका भाकरीच्या तुकड्याची कृतज्ञता आयुष्यभर विसरत नाही. कर्माचा सिद्धांत सांगतो, की निसर्गात काहीही फुकट जात नाही. तुम्ही दिलेली प्रत्येक लहानशी मदत, दाखवलेली करुणा आणि चेहऱ्यावर आणलेले हास्य निसर्ग हजार पटीने तुमच्याकडे परत पाठवतो. म्हणूनच आपले कर्माचे खाते जर समृद्ध आणि आनंदी ठेवायचे असेल, तर पैशांच्या मागे धावताना नैतिकतेचे भान सोडू नका. भ्रष्टाचाराने किंवा कोणाचा विश्वासघात करून मिळवलेली संपत्ती तात्पुरते सुख देईल. पण कर्माच्या खात्यात दिवाळखोरी जाहीर करेल. याउलट गरजू माणसांना मदत करणे, निसर्गाचा आदर करणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या मुक्या, निरागस प्राण्यांचे पालनपोषण करून त्यांच्या चेहऱ्यावर तृप्ती आणणे हाच कर्माच्या खात्यातील खरा ‘बॅलन्स’ आहे.

लक्षात ठेवा जेव्हा आपला अंतिम हिशेब होईल तेव्हा आपण बँकेत ठेवलेले पैसे येथेच राहतील. पण कर्माच्या खात्यात जमा असलेली ‘दया, करुणा आणि पुण्याची शिदोरी’ आपल्याला जन्मोजन्मी तारून नेईल. चला तर मग आजपासूनच आपल्या कर्माच्या खात्यात मुक्या जीवांच्या आशीर्वादाची ठेव जमा करायला सुरूवात करूया.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)